सन २०१७-१८ या वर्षाकरीता महसूल विभागासाठी महत्वाची फलनिष्पत्ती क्षेत्रे [Key Result Areas (KRAs)] निश्चित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्र.केआरए-२०१७/प्र.क्र.३२/म-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ७ फेब्रुवारी, २०१८

परिपत्रक

राज्यातील महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम, गतिमान व पारदर्शक करणे व महसूली उत्पन्नात वाढ करुन राज्याचा विकासाचा मार्ग प्रशस्त करण्याकरीता सन २०१७-१८ करीता महसूल विभागासाठी महत्वाची फलनिष्पत्ती क्षेत्रे [Key Result Areas (KRAs)] निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत विचारांती सन २०१७-१८ करीता महसूल विभागासाठी महत्त्वाची फलनिष्पत्ती क्षेत्रे [Key Result Areas (KRA's)] पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत :-

अ. क्र.	महत्त्वाची फलनिष्पत्ती क्षेत्रे (KRAs)		फलनिष्पत्ती क्षेत्रासाठी महत्त्वाची मानके (K.P.I)	अंमलबजावणीचा स्तर
१	**भूमी अभिलेख अद्यावतीकरण व सुलभीकरण करणे व ई महाभूमी कार्यक्रम प्रभावीपणे राबविणे.**			
	१	ई-फेरफार आज्ञावलीची १००% अंमलबजावणी करणे (जिवती तालुका वगळता)	१. एडीट व रि एडीट मोडयूलचा वापर करुन हस्तलिखीत गा.न.नं.७/१२ संगणकीकृत गा.न.नं.७/१२ शी तंतोतंत जुळविण्याचे काम पुर्ण करणे २. चावडी वाचनाचा कार्यक्रम सर्व गावात यशस्वीपणे राबवून त्यात मिळालेल्या सूचनांच्या अनुषंगाने संगणकीकृत गा.न.नं.७/१२ मध्ये आवश्यक व योग्य बदल करणे. ३. दि.१.१.२०१८ पासून डिजीटल स्वाक्षरीयुक्त संगणकीकृत गा.न.नं.७/१२ चे वितरण सुरु करणे, तसेच त्यासाठी लागणारी पुर्वतयारी जसे की, एचएसएम चे कॉन्फिग्रेशन व शेअरींग पॅटर्न निश्चित करणे	सर्व विभागीय आयुक्त सर्व जिल्हाधिकारी, जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख
	२	अत्याधुनिक अभिलेख कक्षांची उभारणी करणे.	(अ) <u>भूमि अभिलेखांचे स्कॅनिंग करणे</u> (i) सर्व तहसिल कार्यालय व उप अधीक्षक भूमि अभिलेख यांच्या एकूण ७४१ कार्यालयांतील अभिलेखांचे स्कॅनिंग पूर्ण करणे (ii) स्कॅनिंग केलेल्या इमेजेसची गुणवत्ता तपासणी (Quality checking) करणे व मेटा डॅटा एन्ट्रीचे काम पूर्ण करणे (iii) स्कॅन्ड इमेजेस ई-सर्च प्रणालीमधून जनतेस ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यास सुरुवात करणे	सर्व विभागीय आयुक्त सर्व जिल्हाधिकारी, जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख
			(आ) <u>अभिलेख कक्षांमध्ये कॉम्पॅक्टर्स स्थापित करणे</u>. (i) ३४ जिल्ह्यांतील १७५ अभिलेख कक्षांमध्ये कॉम्पॅक्टर्स स्थापित करण्याची संपूर्ण कार्यवाही शासनस्तरावर झालेली असून त्यास प्रशासकीय मान्यता मिळालेली	शासन

			आहे, त्याअनुषंगाने कॉम्पॅक्टर्स खरेदिची प्रक्रीया पुर्ण करणे. (ii) ३४ district, १७५ Record Room मध्ये कॉम्पॅक्टर्स स्थापित करणे.	जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख
	३	पहिल्या फेजमधील ६ जिल्ह्यांतील तसेच मुंबई शहर व मुंबई उपनगर या जिल्ह्यांतील भूमापन नकाशांचे डिजिटायझेशन करणे	• दि.६.१०.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्रातील ६ जिल्ह्यांमध्ये मुळ भूमापन नकाशांचे डिजीटायझेशनच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून त्याबाबत कार्यारंभ आदेश निवड झालेल्या व्हेंडर्सना देण्यात आले आहेत. त्यानुसार भूमापन नकाशांच्या डिजीटायझेशनचे काम विहित कालावधीत पुर्ण करून घेणे. • तसेच मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यांतील भूमापन नकाशांच्या डिजिटायझेशनचे काम MRSAC मार्फत ३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत पुर्ण करुन घेणे.	शासन जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख
	४	२८ जिल्ह्यांतील भूमापन नकाशांचे डिजिटायझेशन करणे	• पहिल्या फेज मधील ६ जिल्ह्यांव्यतिरिक्त उर्वरित २८ जिल्ह्यांतील भूमापन नकाशांचे डिजिटायझेशन करण्याच्या प्रस्तावास वित्त व नियोजन विभागाकडून मान्यता मिळविणे व शासनाची मान्यता मिळविणे. • संबंधित आर.एफ.पी.स मा.तं. संचालनालयाची मान्यता मिळविणे • आर.एफ.पी.स प्रकल्प अंमलबजावणी समितीची मान्यता मिळविणे • आर.एफ.पी.स उच्चाधिकार सचिव समितीची मान्यता मिळविणे • आर.एफ.पी. प्रसिध्द करण्यास शासन मान्यता मिळविणे व आर.एफ.पी. प्रसिध्द करणे • व्हेंडर्स निवडण्यासाठी उच्चाधिकार सचिव समितीची मान्यता घेणे • वरील भूमापन नकाशांच्या डिजीटायझेशनचे काम विहित कालावधीत पुर्ण करून घेण्यासाठी व्हेंडर्सना दि.३१ मार्च २०१८ पुर्वी कार्यादेश देणे.	शासन
	५	६ जिल्ह्यांमध्ये पुनर्मोजणी करणे	• शा.नि.दि.६.१०.२०१६ नुसार ६ जिल्ह्यांमध्ये पुनर्मोजणी करण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. मात्र आता सॅटेलाईट इमेजरी ऐवजी एरीयल फोटोग्राफी वापरण्याचा प्रस्ताव प्राप्त झाल्याने त्यास वित्त, नियोजन, माहिती तंत्रज्ञान विभाग इत्यादींची मान्यता मिळवून मंत्रिमंडळाची मान्यता मिळविणे. • जमिनीची पुनर्मोजणी करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र महसूल अधिनियम, १९६६ मध्ये आवश्यक त्या सुधारणा करणे.	शासन जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख

	६	e-PCIS प्रकल्प कार्यान्वित करणे	शा.नि.दि.३१ मार्च, २०१७ अन्वये e-PCIS प्रकल्प राज्यात राबविण्यास शासनाने मान्यता दिली आहे. त्यानुसार e-PCIS चे काम खालील टप्प्यात पुर्ण करुन घेणे:- • संगणक आज्ञावली विकसित करणे. • कार्यालयांना संगणक खरेदी करुन देणे. • सध्या अस्तित्वात असलेल्या प्रॉपर्टी कार्डचा डेटा रिस्ट्रक्चरींग करुन घेणे. • तसेच इतर कामे जसे की, ट्रेनिंग, सॉफ्टवेअर इन्स्टॉलेशन, कनेक्टीव्हीटी उपलब्ध करुन e-PCIS प्रकल्प कार्यान्वित करणे.	शासन जमाबंदी आयुक्त व संचालक भूमी अभिलेख, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
२	**शासकीय जमिनींचा इष्टतम वापर करणे.**			
	७	(अ) प्रदान केलेल्या शासकीय जमिनींवरील सहकारी गृहनिर्माण संस्थां मधील सदनिका/ गाळा यांच्या हस्तांतरणाकरिता आकारावयाच्या हस्तांतरण शुल्काचे दर सुधारित करणे.	१. धोरणाच्या प्रारुपास विधी व न्याय विभाग व वित्त विभागाची सहमती घेणे. २. वित्त विभागाच्या मान्यतेनंतर सदर प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणे. ३. शासनाच्या मान्यतेनंतर याबाबत सर्वसमावेशक शासन निर्णय निर्गमित करणे.	शासन
		(ब) प्रदान केलेल्या शासकीय जमिनींवरील सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील सक्षम प्राधिकारी अथवा जिल्हाधिकारी यांच्या पूर्वपरवानगी शिवाय हस्तांतरित झालेल्या सदनिका /गाळा यांच्या हस्तांतरणाची प्रकरणे अधिमुल्य आकारून नियमानुकूल करण्याबाबत क्षेत्रिय प्राधिकारी यांना दिशानिर्देश देणे.	१. धोरणाच्या प्रारुपास विधी व न्याय विभाग व वित्त विभागाची सहमती घेणे. २. वित्त विभागाच्या मान्यतेनंतर सदर प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणे. ३. शासनाच्या मान्यतेनंतर याबाबत सर्वसमावेशक शासन निर्णय निर्गमित करणे.	शासन
	८	उर्वरीत महाराष्ट्रातील भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या शासकीय जमिनींचे संपुष्टात आलेल्या भाडेपट्टयांच्या नूतनीकरणाचे धोरण निश्चित करणे	१. प्रारुप मंत्रिमंडळ टिप्पणीस विधी व न्याय विभाग व वित्त विभागाची सहमती घेणे. २. मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणे. ३. मंत्रिमंडळ मान्यतेनंतर याबाबत सर्वसमावेशक शासन निर्णय निर्गमित करणे.	शासन
	९	राज्यात जिमखान्यांना प्रदान केलेल्या शासकीय जमिनींच्या भाडेपट्टयांचे नुतनीकरण	१. प्रारुप मंत्रिमंडळ टिप्पणीस विधी व न्याय विभाग व वित्त विभागाची सहमती घेणे. २. मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणे. ३. मंत्रिमंडळ मान्यतेनंतर याबाबत स्वयंस्पष्ट शासन निर्णय निर्गमित करणे.	शासन

		करण्यासंदर्भात धोरण निश्चित करणे		
	१०	नझूल भाडेपट्टयांच्या जमिनी फ्री होल्ड (भोगवटादार वर्ग-१) करण्यासंदर्भात शासन नियुक्त अभ्यास समितीचा अहवाल प्राप्त करुन त्यातील शिफारशीं बाबत शासनादेश प्राप्त करणे.	१. अभ्यास समितीचा अहवाल प्राप्त करणे. २. सदर अहवाला आधारे प्रारुप विधेयकासह मंत्रिमंडळ टिप्पणीस विधी व न्याय विभाग व वित्त विभागाची सहमती घेणे. ३. मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणे ४. मंत्रिमंडळ मान्यतेनंतर याबाबत स्वयंस्पष्ट शासन निर्णय निर्गमित करणे	शासन
	११	भाडेपट्टयांवरील व भोगवटदार वर्ग-२ च्या धारणाधिकाराच्या जमिनीं-चे भोगवटदार वर्ग-१ या धारणाधिकारामध्ये रुपांतरण करण्याबाबतचे धोरण व नियम तयार करणे.	१. या बाबत नियुक्त समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रारुप मंत्रीमंडळ टिपणीस विधी व न्याय विभाग व वित्त विभागाची सहमती घेणे. २. मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणे ३. मंत्रिमंडळ मान्यतेनंतर याबाबत स्वयंस्पष्ट शासन निर्णय निर्गमित करणे / नियमांचा मसूदा शासन राजपत्रात हरकती व सूचनांसाठी प्रसिध्द करणे. ४. नियम अंतिमतः शासन राजपत्रात प्रसिध्द करणे.	शासन
	१२	बृहन्मुंबईतील खार जमीनींच्या इष्टतम वापरासाठी बृहत आराखडा तयार करणे.	१. एम.एम.आर.डी.ए. कडून बृहन्मुंबईतील खार जमिनीच्या इष्टतम वापरासाठी बृहत आराखडा तयार करुन घेणे. २. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर तो मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समितीस सादर करणे. ३. सदर बृहत आराखडयास राज्य शासनाची मान्यता प्राप्त करुन केंद्र शासनाकडे सादर करणे.	शासन
	१३	महसूल विभाग व शासनाच्या इतर विभागांच्या अखत्यारीत असणाऱ्या शासकीय जमीनींची माहिती Land Bank च्या स्वरुपात संकलित करणे.	शासकीय जमीनींचे राज्य शासनाच्या इतर विभागांना विशिष्ट प्रयोजनार्थ वेळोवेळी वाटप करण्यात आले आहे. अनेक ठिकाणी शासकीय जमिनी अद्याप मोकळया आहेत. अशा शासकीय जमीनींचा इष्टतम वापर होण्याच्या दृष्टीने सदर जमीनींच्या माहितीचे Land Bank च्या स्वरुपात संकलन करणे. जिल्हाधिकारी, वाशिम यांनी विकसीत केलेल्या संगणकीय आज्ञावलीचा वापर करुन प्रत्येक जिल्ह्यातील संकलित जमिनींची माहिती सदर आज्ञावलीत साठविणे.	शासन
३	**महसूल उत्पन्न वाढीच्या दृष्टीने कृती कार्यक्रम राबविणे.**			
	१४	सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी जमिन व गौणखनिज वसुलीचे उद्दिष्ट विहित कालावधीत पुर्ण करणे.	सन २०१७-१८ या वर्षासाठी संपुर्ण राज्याकरीता निश्चित करण्यात आलेल्या जमिन महसूल वसूलीचे उद्दिष्ट रु.३२००/- कोटी व गौणखनिजचे वसूलीचे उद्दिष्ट रु.२४००/- कोटी इतक्या रकमेचे विभागनिहाय व जिल्हानिहाय वसूलीचे उद्दिष्ट विहित कालावधीत पुर्ण करणे.	सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी, संचालक, भूमि अभिलेख
	१५	सन २०१७-१८ साठी विहित उद्दिष्टानुसार १००% मुद्रांक शुल्कापोटी महसूल वसूल करणे	सन २०१७-१८ साठीचे मुद्रांक शुल्क वसुलीचे उद्दिष्ट रू.२१००० कोटी असून सदर उद्दिष्ट विहित कालावधीत पुर्ण करणे	शासन, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य

१६	महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, च्या विविध कलमांमध्ये "शुल्क/ आकार/दंड (शास्ती)/ रुपांतरण कर इत्यादी" च्या दरांमध्ये वेळोवेळी नियमान्वये सुधारणा करण्याची तरतूद सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२१ अन्वये करण्यात आली आहे. त्यानुसार याबाबतचे नियम तयार करणे.	१. नियमांचे प्रारुप तयार करणे. २. प्रारूप नियमास विधी व न्याय विभाग व वित्त विभागाची सहमती घेणे. ३. नियमांचे प्रारूप शासनास मान्यतेसाठी सादर करणे ४. शासन मान्यतेनंतर याबाबतचा मसूदा शासन राजपत्रात हरकती व सूचना मागविण्यासाठी प्रसिध्द करणे. ५. हरकती सूचना विचारात घेऊन शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर नियम अंतिमतः शासन राजपत्रात प्रसिध्द करणे.	शासन
१७	आकारी पड जमीन मुळ शेतकऱ्यांना प्रकरणपरत्वे दंड व खंडाची रक्कम आकारून परत करता यावी या करीता महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम १८२ मध्ये सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २७ अन्वये तरतूद करण्यात आली आहे. या तरतूदीच्या अंमलबजावणीकरीता नियम तयार करणे.	१. नियमांचे प्रारुप तयार करणे २. प्रारूप नियमास विधी व न्याय विभाग व वित्त विभागाची सहमती घेणे. ३. नियमांचे प्रारूप शासनास मान्यतेसाठी सादर करणे ४. शासन मान्यतेनंतर याबाबतचा मसूदा शासन राजपत्रात हरकती व सूचना मागविण्यासाठी प्रसिध्द करणे. ५. हरकती सूचना विचारात घेऊन शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर नियम अंतिमत: शासन राजपत्रात प्रसिध्द करणे.	शासन
१८	महाराष्ट्र शेतजमीन (धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ मध्ये सदर अधिनियमान्वये अतिरिक्त ठरवून वाटप केलेल्या, परंतु विना परवानगी कृषिक अथवा अकृषिक कारणांसाठी खरेदी विक्री झालेल्या जमीनींचे व्यवहार नजराणा आणि दंड आकारुन नियमानुकूल करण्याची तरतूद करणे.	१. प्रारुप विधेयकासह मंत्रिमंडळ टिप्पणीस विधी व न्याय विभाग व वित्त विभागाची सहमती घेणे. २. मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणे ३. मंत्रिमंडळ मान्यतेनंतर याबाबतचे विधेयक विधानमंडळास संमतीसाठी सादर करणे	शासन
१९	वाळू/रेती निर्गती विषयी सर्वंकष सुधारित धोरण विहित करणे.	१. प्रारुप मंत्रीमंडळ टिप्पणीस पर्यावरण विभाग व वित्त विभागाची सहमती प्राप्त करणे. २. मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणे. ३. मंत्रिमंडळ मान्यतेनंतर शासन निर्णय निर्गमित करणे.	शासन

२०	अवैध उत्खनन व वाहतूकीसाठी वापरलेल्या यंत्रसामग्री आणि वाहनांवर शास्तीची रक्कम निश्चित करण्याविषयी नियमांन्वये तरतूद करणे.	१. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम ४८ (८) मध्ये अवैध उत्खनन व वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली यंत्रसामग्री व वाहने जप्त करण्याची तरतूद करण्यात आली असून अशा यंत्रसामुग्री व वाहनावर शास्ती करण्याचीही तरतूद केली आहे. त्यानुसार अशा यंत्रसामुग्री व वाहनावर शास्तीची रक्कम निश्चित करण्याकामी नियम करण्याच्या दृष्टीने अनुषंगिक प्रारूप अधिसूचना प्रसिध्द करणे.	शासन
		२. उक्त नियमा संबंधी अंतिम अधिसूचना प्रसिध्द करणे.	
२१	(अ) केंद्र शासनाने खनिजाची निर्गती लिलावाद्वारे करण्याबाबत दिलेल्या निदेशानुसार गौण खनिजाचे खनिपट्टे व परवाने लिलावाद्वारे मंजूर करण्यासाठी लिलावा संबंधीचे नियम तयार करणे.	१. प्रारुप मंत्रिमंडळ टिप्पणीस विधी व न्याय विभागाची व वित्त विभागाची सहमती घेणे.	शासन
		२. मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणे.	
		३. नियम राजपत्रात प्रसिध्द करणे.	
	(ब) गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्यासाठी गौण खनिजाच्या वापरकर्त्यांने गौण खनिजाच्या खरेदीच्या वैध वाहतुकीची कागदपत्रे स्वत:जवळ ठेवण्याबाबतची तरतूद नियमात करणे.	१. प्रारुप मंत्रीमंडळ टिप्पणीस विधी व न्याय विभाग व वित्त विभागाची सहमती घेणे.	शासन
		२. मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणे.	
		३. मंत्रीमंडळ मान्यतेनंतर नियम राजपत्रात प्रसिध्द करणे.	
२२	महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २९५ मध्ये सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २९ अन्वये सुधारीत तरतूद करण्यात आली आहे. या तरतूदीच्या अंमलबजावणी साठी धोरणात्मक दिशानिर्देश निर्गमित करणे.	१. प्रारुप मंत्रिमंडळ टिपणी वित्त विभागास सहमतीसाठी सादर करणे	शासन
		२. मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणे	
		३. मंत्रिमंडळ मान्यतेनंतर याबाबत स्वयंस्पष्ट शासन निर्णय निर्गमित करणे.	
२३	महालेखापालांकडून प्राप्त जमा लेखापरिच्छेदांचा मोहिमेच्या स्वरुपात निपटारा करणे	एकूण जमा लेखा परिच्छेदांपैकी किमान ७५ टक्के लेखा परिच्छेदांचा निपटारा करणे.	शासन, सर्व विभागीय आयुक्त, जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, नोंदणी महानिरीक्षक व

			मुद्रांक नियंत्रक, सर्व जिल्हाधिकारी,
२४	विविध प्रयोजनार्थ शासकीय जमीन सवलतीच्या दराने प्रदान करण्याबाबतचे प्रचलित धोरण सुधारित करणे	१. प्रारुप मंत्रिमंडळ टिप्पणी वित्त विभागास सहमतीसाठी सादर करणे २. मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणे ३. मंत्रिमंडळ मान्यतेनंतर याबाबत स्वयंस्पष्ट शासन निर्णय निर्गमित करणे.	शासन
२५	देवस्थान इनाम जमिनी-संदर्भात शासन नियुक्त समितीचा अहवाल प्राप्त करुन त्यातील शिफारशी विषयी शासनादेश मिळविणे.	१. अहवाल शासनास प्राप्त करुन घेवून त्यातील शिफारशीं विषयी वित्त विभाग व विधी व न्याय विभागाचे अभिप्राय प्राप्त करणे. २. अहवालातील शिफारशी बाबत मंत्रीमंडळापुढे प्रस्ताव सादर करणे	शासन
२६	मंजूर केलेल्या शासकीय जमिनीवर जाहिरात फलक उभारण्यासाठी अनुज्ञप्ती फी/शुल्क आकारण्या-बाबतचे धोरण निश्चित करणे.	१. धोरण अनुषंगिक प्रस्तावास नगर विकास विभागाचे अभिप्राय मिळविणे. २. प्रस्तावास वित्त विभागाची सहमती मिळविणे. ३. प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणे. ४. शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर शासन आदेश निर्गमित करणे.	शासन
२७	औद्योगिक प्रयोजनासाठी मंजूर केलेल्या शासकीय जमिनीचा (नझुल जमिनी वगळून) वापर त्या प्रयोजनाऐवजी शैक्षणिक किंवा रुग्णालय विषयक किंवा अन्य धर्मादाय प्रयोजनासाठी करण्यास परवानगी देताना आकारावयाच्या अधिमुल्याबाबत.	१. प्रारुप मंत्रिमंडळ टिपणीस वित्त विभागाची सहमती घेणे. २. मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणे. ३. मंत्रिमंडळ मान्यतेनंतर याबाबत सर्वसमावेशक शासन निर्णय निर्गमित करणे.	शासन
२८	बृहन्मुंबई येथील शासकीय जमिनींवरील जिमखान्यांच्या संपृष्टात आलेल्या भाडेपट्टयांच्या नुतनीकरणाचे धोरण ठरविणे.	१) जिमखान्यांना दिलेल्या जमिनीच्या भाडेपट्टयांचे क्षेत्रानुसार अ, ब व क असे वर्गीकरण करुन दि. १.१.२०१७ पासून ३० वर्षांसाठी नुतनीकरन करण्यात यावे. २) भुईभाड्यात दर वर्षी ४% इतकी वाढ करण्यात यावी. तसेच दर पाच वर्षांनी भुईभाड्यात सुधारणा करण्यात येईल. ३) जिमखान्याच्या एकूण सभासद संख्येच्या ५% सभासद केंद्र/राज्य शासनाच्या सेवेतील "अ" वर्ग अधिकाऱ्यांमधून "सर्व्हिस मेंबर्स" म्हणून घेणे आवश्यक. ४) जिमखान्यांना एका कॅलेंडर वर्षात जास्तीत जास्त ४५ दिवस जिमखान्याच्या मैदानावर निश्चित केलेली अनुज्ञप्ती फी भरुन क्रिडेतर कार्यक्रम घेण्यास मुभा राहील.	जिल्हाधिकारी, मुंबई शहर

४	**महसूल बाबीं विषयक अर्धन्यायिक कामकाज गतीमान करणे.**			
	२९	**“लिज पेडन्स”** च्या नोंदी न घेण्यासंदर्भात क्षेत्रीय कार्यालयास परिपत्रकान्वये सूचना निर्गमित करणे.	१. महाधिवक्ता यांचे सदर धोरणाबाबत अभिप्राय प्राप्त करणे. २. महाधिवक्ता यांच्या प्राप्त अभिप्रायांच्या आधारे प्रारुप प्रस्ताव तयार करणे. ३. सदरहू प्रारुप प्रस्तावास शासनाची मान्यता प्राप्त करणे. ४. शासन मान्यतेनंतर याबाबत शासन परिपत्रक निर्गमित करणे.	शासन
	३०	महसूल अधिकारी व भूमापन अधिकारी यांना पाच वर्षांनंतर देखील शासनाच्या पूर्वमान्यते नंतर अर्ध-न्यायिक आदेशाचे पुनरिक्षण करणे शक्य व्हावे याकरीता महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २५७ मध्ये सुधारणा करणे.	१. प्रारुप मंत्रिमंडळ टिपणीस विधी व न्याय विभाग व वित्त विभागाची सहमती घेणे. २. मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणे. ३. मंत्रिमंडळ मान्यतेनंतर याबाबत विधी व न्याय विभागाच्या सल्ल्याने विधेयकाचे प्रारूप अंतिम करून विधान मंडळासमोर सादर करणे.	शासन
	३१	महसूल अधिकारी किंवा भूमापन अधिकारी यांच्या समोरील अर्ध-न्यायिक प्रकरणात १ वर्ष अधिक ६ महिन्याच्या वाढीव कालावधीनंतर पुढील मुदतवाढ देण्याचे अधिकार शासन स्तरावर घेणे.	याबाबत अध्यादेश काढण्यासाठी मंत्रीमंडळाकडे प्रस्ताव सादर करण्यासाठी नस्ती मा.मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहे.	संबंधित जिल्हाधिकारी
	३२	प्रादेशिक योजनांमधील निवासी/वाणिज्यिक/ औद्योगीक किंवा अन्य बिगर शेती वापरासाठी विर्निदिष्ट क्षेत्रातील बेकायदेशीर व्यवहार नियमानुकूल करण्याच्या दृष्टीने "महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रिकरण करण्याबाबत अधिनियम" यात सुधारणा करणे.	१. प्रारुप मंत्रिमंडळ टिपणीस विधी व न्याय विभाग व वित्त विभागाची सहमती घेणे. २. मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणे. ३. मंत्रिमंडळ मान्यतेनंतर याबाबत विधी व न्याय विभागाच्या सल्ल्याने विधेयकाचे प्रारूप अंतिम करून विधान मंडळासमोर सादर करणे.	शासन
	३३	शासन मान्यताप्राप्त "निकडीचे सार्वजनिक प्रकल्प (Vital Public Projects)" यांच्याकरीता संबंधित प्रशासकीय विभागांच्या अधिपत्या-	१. प्रारुप मंत्रिमंडळ टिपणीस वित्त विभागाची सहमती घेणे. २. मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणे.	शासन

		खालील शासकीय जमिनींचा आगाऊ ताबा संबंधित प्रकल्प राबविणाऱ्या यंत्रणेस देण्याविषयी धोरणात्मक दिशानिर्देश निर्गमित करणे.	३. मंत्रिमंडळ मान्यतेनंतर याबाबत सर्वसमावेश शासन निर्णय निर्गमित करणे.	
५	**उद्योगधंद्यास प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने महसूल प्रशासनांतर्गत कार्यपध्दतीचे सुलभिकरण - उद्योग व्यवसाय सुगमता साध्य करणे.**			
	३४	निती आयोगाच्या संकल्प-नेनुसार शेती प्रयोजनार्थ, शेतजमीनी भाडेपट्टयाने देण्याची सुविधा निर्माण करण्यासाठी नविन कायदा करणे.	१. प्रारुप विधेयकासह मंत्रीमंडळ टिप्पणीस विधी व न्याय विभाग व वित्त विभागाची सहमती घेणे.	शासन
			२. मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणे.	
			३. मंत्रिमंडळ मान्यतेनंतर याबाबतचे विधेयक विधानमंडळास संमतीसाठी सादर करणे.	
	३५	मालमत्ता हक्क प्रमाणीकरण प्रणाली राबविण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यामध्ये सुधारणा करणे.	१. प्रारुप विधेयकासह मंत्रीमंडळ टिप्पणीस विधी व न्याय विभाग व वित्त विभागाची सहमती घेणे.	शासन
			२. मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणे.	
			३. मंत्रिमंडळ मान्यतेनंतर याबाबतचे विधेयक विधानमंडळास संमतीसाठी सादर करणे.	
	३६	महाराष्ट्र शेतजमीन (धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ या अधिनियमाच्या संबंधित कलमांत खऱ्याखुऱ्या औद्योगिक प्रयोजन आणि विशेष नगर वसाहत यांची व्याख्या समाविष्ट करणे. तसेच सदर प्रयोजनासाठी शेतजमीन खरेदी करण्या-साठी धारणेच्या कमाल मर्यादेपासून सूट देण्या-संबंधी तरतूद करणे.	१. प्रारुप विधेयकासह मंत्रिमंडळ टिप्पणीस विधी व न्याय विभाग व वित्त विभागाची सहमती घेणे.	शासन
			२. मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणे	
			३. मंत्रिमंडळ मान्यतेनंतर याबाबतचे विधेयक विधानमंडळास संमतीसाठी सादर करणे.	
	३७	राज्यातील महत्वाच्या अशासकीय प्रकल्पांना, तसेच केंद्र शासन/ राज्य शासन किंवा त्यांच्या वैधानिक प्राधिकरणास सार्वजनिक प्रयोजनासाठी अपरिहार्यपणे आवश्यक	१. प्रारुप विधेयकासह मंत्रीमंडळ टिपणीस विधी व न्याय विभाग व वित्त विभागाची सहमती घेणे.	शासन
			२. मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणे.	

		गायरान/ गुरचरण जमीन, प्रकल्पासाठी प्रदान करणे शक्य व्हावे, या उद्देशाने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २२ नंतर कलम २२अ समाविष्ट करणे.	३. मंत्रिमंडळ मान्यतेनंतर याबाबतचे विधेयक विधानमंडळास संमतीसाठी सादर करणे.	
	३८	अकृषिक आकारणीच्या प्रमाणदरात कायद्याप्रमाणे सुधारणा करुन सुधारीत प्रमाणदरांच्या आधारे अकृषिक आकारणीची वसूली करण्यास मान्यता देणे.	१. मंत्रीमंडळ टिप्पणी प्रारुप विधेयकासह विधी व न्याय विभाग व वित्त विभागाची सहमती घेणे. २. मंत्रीमंडळासमोर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणे. ३. यासंदर्भातील अध्यादेश मा.राज्यपाल महोदयांच्या मान्यते-नंतर प्रख्यापित करणे. ४. मंत्रीमंडळ मान्यतेनंतर विधेयक विधानमंडळासमोर मान्यतेसाठी सादर करणे.	शासन
	३९	महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ मध्ये कलम ४२ ड हे नविन कलम समाविष्ट करुन गावठाणा लगतच्या भागात जमिनीचा अकृषिक वापर सुलभ करण्याकामी सुधारणा करणे.	१. मंत्रीमंडळ टिप्पणी प्रारुप विधेयकासह विधी व न्याय विभाग व वित्त विभागाची सहमती घेणे. २. मंत्रीमंडळासमोर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणे. ३. यासंदर्भातील अध्यादेश मा.राज्यपाल महोदयांच्या मान्यतेनंतर प्रख्यापित करणे. ४. मंत्रीमंडळ मान्यतेनंतर विधेयक विधानमंडळासमोर मान्यतेसाठी सादर करणे.	शासन
	४०	विमानतळ, बस स्थानके तसेच बंदरे यासारख्या सार्वजनिक परिवहना-करीता आवश्यक असलेल्या क्षेत्रांमध्ये सरसकट सर्व जागेवर “महाराष्ट्र जमीन महसूल व विशेष आकारणी यामध्ये वाढ करण्याबाबत अधिनियम, १९७४” च्या कलम ३ मधील तरतूदीन्वये वाढीव दराने अकृषिक कराची आकारणी न करता संबंधित क्षेत्रातील कार्यचलनाकरीता आवश्यक असलेल्या जमीनींवर अशा आकारणीतून सूट देण्यासाठी कायद्यात सुधारणा करणे.	१.मंत्रीमंडळ टिप्पणी प्रारुप विधेयकासह विधी व न्याय विभाग व वित्त विभागाची सहमती घेणे. . २.मंत्रीमंडळासमोर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणे. ३.मंत्रीमंडळ मान्यतेनंतर विधेयक विधानमंडळासमोर मान्यतेसाठी सादर करणे	

६	**लोकाभिमुख महसूल प्रशासनासाठी महाराजस्व अभियान राबविणे व इतर धोरणात्मक निर्णय घेणे.**			
	४१	सिंधी समाजाच्या व्यक्तींना प्रदान केलेल्या जमिनीच्या धारणाधिकारात बदल करणे व त्या अनुषंगिक सर्वंकष धोरण निश्चित करणे.	१. याबाबतच्या धोरणाच्या प्रारुपास वित्त विभागाची सहमती घेणे.	शासन
			२. शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणे.	
			३. शासन मान्यतेनंतर याबाबत शासन निर्णय निर्गमित करणे.	
	४२	महाराष्ट्र कुळ वहिवाट व शेत जमिन अधिनियमा च्या कलम १८-अ तसेच कलम १७-ब (१) नुसार शेतमजूर व कारागिरांच्या गावांतील वस्त्यांची ठिकाणे आणि घराखालील जमिनी या संबंधीचे सर्व्हेक्षण पुर्ण करुन अधिकार अभिलेख तयार करून नियम तयार करणे.	१. याबाबतच्या मंत्रीमंडळ टिपणी आणि नियमांच्या प्रारुपास विधी व न्याय विभाग आणि वित्त विभागाची सहमती घेणे.	शासन
			२. सदर प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करणे.	
			३. शासन मान्यतेनंतर सदर नियमांचा मसूदा शासन राजपत्रात प्रसिध्द करणे.	
	४३	राज्यातील अकृषिक जमिनीच्या/ नागरी भागातील जमिनीच्या क्षेत्र दुरूस्ती विषयक प्रकरणे हाताळण्याबाबत कायद्यातील तरतूदी संबंधी असलेली संदिग्धता दूर करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम १३५ मध्ये सुधारणा करणे.	१. प्रारुप विधेयकासह मंत्रीमंडळ टिपणीस विधी व न्याय विभाग व वित्त विभागाची सहमती घेणे.	शासन
			२. मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव मान्यते साठी सादर करणे.	
			३. मंत्रिमंडळ मान्यतेनंतर याबाबतचे विधेयक विधानमंडळास संमतीसाठी सादर करणे.	
७	**महसूल यंत्रणेच्या सक्षमीकरणासाठी उपाययोजना करणे.**			
	४४	विविध महसूली संवर्गांकरिता प्रशिक्षण धोरण निश्चित करणे	१. **अ)** राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत महसूल विभागाच्या विविध संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांचे पाच प्रकारच्या सेवांतर्गत प्रशिक्षणा साठी ट्रेनिंग मोडयूल आणि कॅलेंडर तयार करणे.	शासन
			ब) तांत्रिक प्रशिक्षणांतर्गत अधिकारी /कर्मचाऱ्यांच्या वर्षभराच्या प्रशिक्षणा साठी ट्रेनिंग मोडयूल आणि कॅलेंडर तयार करणे.	
			२. प्रस्तावित ट्रेनिंग मोड्यूल व कँलेडर क्रियान्वित करण्यास वित्त विभागाची सहमती प्राप्त करणे.	
			३. या संदर्भात शासन निर्णय निर्गमित करणे.	
	४५	महसूल विभागाच्या आकृतीबंधाचा आढावा घेऊन नवीन आकृतीबंध निश्चित करणे.	क्षेत्रिय व शासन स्तरावरील कर्मचारी वर्गाचा आढावा घेवून सुधारीत आकृतीबंध अंतिम करणे	शासन

८	**प्रशासकीय सौकार्याच्या दृष्टीने महसूली क्षेत्रांच्या पुनर्गठनाविषयी धोरण निश्चित करणे.**			
	४६	जिल्हा विभाजन/ पुनर्रचनेचे निकष निश्चित करणे.	१. जिल्हा विभाजन/पुनर्रचना समितीच्या प्राप्त अहवाला-संबंधी प्रारुप मंत्रीमंडळ टिपणी व अहवाल वित्त विभागास सहमतीसाठी सादर करणे.	शासन
			२. मंत्रिमंडळापुढे प्रस्ताव सादर करणे	
			२. मंत्रिमंडळाच्या मान्यतेनुसार जिल्हा विभाजन / पुनर्रचनेचे निकष निश्चित करण्याबाबतचे आदेश निर्गमित करणे..	
	४७	तालुका विभाजनाचे निकष निश्चित करणे.	१. तालुका विभाजनाचे निकष निश्चित करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीने सादर केलेला अहवाल मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करणे.	शासन
			२. मंत्रिमंडळाच्या मान्यतेनुसार तालुका विभाजनाचे निकष निश्चित करण्याबाबतचे आदेश निर्गमित करणे.	
	४८	राज्यात नवीन तलाठी साझा व नविन महसूली मंडळ निर्मितीची सुनिश्चिती करणे.	१. मंत्रीमंडळ उपसमितीचा अहवाल मंत्रीमंडळास मान्यतेसाठी व निर्णयार्थ सादर करुन मंत्रीमंडळाच्या मान्यतेनुसार तलाठी साझा पुनर्रचना व पदनिर्मिती करणे.	सर्व जिल्हाधिकारी शासन
			२. मंजूर वाढीव तलाठी साझे व मंडळ कार्यालय स्थापन करण्याकरीता वेळापत्रक तयार करुन ते प्रत्यक्ष कार्यान्वित करणे.	
			३. वाढीव तलाठी साझे व मंडळ कार्यालयांसाठी नवीन पदनिर्मितीचा प्रस्ताव उच्चाधिकार समितीसमोर सादर करुन नवीन पद निर्मिती करणे.	
९	**विधानमंडळ कामकाज विषयक प्रकरणे जलदगतीने निकाली काढणे.**			
	४९	विधान मंडळ कामकाज अविलंब निकाली काढणे.	१. लोकलेखा समिती तसेच इतर विधान मंडळ समित्यांच्या अहवालातील शिफारशींवर सत्वर कार्यवाही करणे.	शासन, सर्व विभागीय आयुक्त, जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, सर्व जिल्हाधिकारी,
			२. प्रलंबित अतारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना, औचित्याचे मुद्दे, कपात सूचना इत्यादी विधान मंडळाशी संबधित बाबींना विहित कालावधीत उत्तरे / निवेदने सादर करणे.	
	५०	महालेखापालांच्या विविध अहवालातील प्रलंबित परिच्छेदांवर स्पष्टीकरणात्मक ज्ञापने सादर करणे व लोकलेखा समितीच्या शिफारशींवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करणे.	१. विनियोजन लेखे अहवाल सादर करणे. (सन २०११-१२, २०१२-१३, २०१३-१४)	शासन, सर्व विभागीय आयुक्त, जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, सर्व जिल्हाधिकारी,
			२. नागरी अहवालावरींल स्पष्टीकरणा त्मक ज्ञापने सादर करणे. (सन २०११-१२, २०१२-१३, २०१३-१४)	
			३. महसूली जमा अहवालावरींल स्पष्टीकरणात्मक ज्ञापने सादर करणे. (सन २०११-१२, २०१२-१३, २०१३-१४)	

१०	नोंदणी व मुद्रांक शुल्क विभाग- महसुली उत्पन्न वाढ व कामकाजात सुधारणांच्या दृष्टीने करावयाच्या उपाययोजना			
	५१	e-SBTR व्दारे मुद्रांक शुल्क भरण्यासाठी किमान मर्यादा रु.५०००/- वरुन ती रू.१००/- पर्यंत कमी करणे	१. प्रारुप मंत्रिमंडळ टिप्पणीस विधी व न्याय विभाग व वित्त विभागाची सहमती घेणे.	शासन
			२. मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणे.	
			३. मंत्रिमंडळ मान्यतेनंतर त्यानुसार याबाबत सर्व समावेशक शासन निर्णय निर्गमित करणे.	
	५२	महाराष्ट्र मुद्रांक अधि-नियमातील अनुसूची १ मधील अनुच्छेद ३५ (Article 25 of Schedule 1) व अनुच्छेद ३४ (Article 34 of Schedule-I) मध्ये सुधारणा करणे.	१. प्रारुप मंत्रिमंडळ टिप्पणीस विधी व न्याय विभाग व वित्त विभागाची सहमती घेणे.	शासन
			२. मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणे.	
			३. मंत्रिमंडळ मान्यतेनंतर उक्त सुधारणेचे विधेयक विधी व न्याय विभागाच्या मार्फत मा.विधानमंडळास सादर करणे	
			४. मा.विधानमंडळाच्या मान्यतेनंतर सुधारीत अधिनियम विधी व न्याय विभागामार्फत राजपत्रात अधिसूचित करणे.	
	५३	महाराष्ट्र मुद्रांक अधि-नियमातील कलम १० डी व ३० अ मध्ये सुधारणा करणे	१. प्रारुप मंत्रिमंडळ टिप्पणीस विधी व न्याय विभाग व वित्त विभागाची सहमती घेणे	शासन
			२. मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणे	
			३. मंत्रिमंडळ मान्यतेनंतर उक्त सुधारणेचे विधेयक विधी व न्याय विभागाच्या मार्फत मा.विधानमंडळास सादर करणे	
			४. मा.विधानमंडळाच्या मान्यतेनंतर सुधारीत अधिनियम विधी व न्याय विभागामार्फत राजपत्रात अधिसूचित करणे.	
	५४	महाराष्ट्र मुद्रांक अधि नियमातील कलम २(g) व अनुसूची १ मधील अनुच्छेद २५ (da) मध्ये सुधारणा करणे	१. प्रारुप मंत्रिमंडळ टिप्पणीस विधी व न्याय विभाग व वित्त विभागाची सहमती घेणे.	शासन
			२. मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणे.	
			३. मंत्रिमंडळ मान्यतेनंतर उक्त सुधारणेचे विधेयक विधी व न्याय विभागाच्या मार्फत मा.विधानमंडळास सादर करणे	
			४. मा.विधानमंडळाच्या मान्यतेनंतर सुधारीत अधिनियम विधी व न्याय विभागामार्फत राजपत्रात अधिसूचित करणे.	
	५५	महाराष्ट्र मुद्रांक (मिळकतीचे वास्तव बाजारमूल्य निश्चित करणे) नियम १९९५ मध्ये वार्षिक मूल्य दर तक्त्यांसोबतच्या मार्गदर्शक सूचनांचा समावेश करण्यासाठी नियम तयार करणे.	१. प्रारुप मंत्रिमंडळ टिप्पणीस विधी व न्याय विभाग व वित्त विभागाची सहमती घेणे .	शासन
			२. प्रारुप मंत्रिमंडळ टिप्पणीस विधी व न्याय विभाग व वित्त विभागाची सहमती घेणे.	
			३. मंत्रिमंडळ मान्यतेनंतर त्यानुसार उक्त मार्गदर्शक सुचनांसाठीचे नियम राजपत्रात अधिसुचित करणे .	
			४. उक्त नियम विधानमंडळाच्या पटलावर ठेवणे .	

५६	भारतीय मुद्रांक अधि-नियमाच्या कलम ९(ब) मधील तरतुदींनूसार एकत्रित मुद्रांक शुल्काचे आदेश निर्गमित करण्या-च्या कार्यपध्दतीत सुलभता आणण्याच्या अनुषंगाने नियम तयार करणे	१. प्रारुप टिप्पणीस विधी व न्याय विभाग व वित्त विभागाची सहमती घेणे. २. प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करणे ३. शासन मान्यतेनंतर त्यानुसार याबाबतचे आदेश राजपत्रात अधिसुचित करणे	शासन
५७	दस्त हाताळणी शुल्काची रक्कम SBI e-Pay व्दारे Online स्विकारुन दुय्यम निबंधक कार्यालये रोकड विरहित (Cashless)करणे.	१. प्रारुप मंत्रिमंडळ टिप्पणीस माहिती व तंत्रज्ञान विभाग व वित्त विभागाची सहमती घेणे २. मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणे. ३. मंत्रिमंडळ मान्यतेनंतर त्यानुसार याबाबत सर्व समावेशक शासन निर्णय निर्गमित करणे.	शासन, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
५८	कोणत्याही व्यक्तीने स्थानिक प्राधिकरणाच्या नावाने निष्पादित केलेल्या संलेखावर, महाराष्ट्र मुद्राकं अधिनियमातील अनुसुची एक मधील अनुच्छेद २५ च्या खंड ब नूसार आकारणी योग्य असलेले मुद्रांक शुल्क माफी करण्याबाबत दि.३१.१०.२००३ रोजीचे आदेश ‘मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला’ लागु करण्याबाबत शासन आदेश निर्गमित करणे.	१. प्रारुप टिप्पणीस विधी व न्याय विभाग व वित्त विभागाची सहमती घेणे. २. प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करणे. ३. शासन मान्यतेनंतर त्यानुसार याबाबतचे आदेश राजपत्रात अधिसुचित करणे.	शासन
५९	मुंबई अंतरराष्ट्रीय विमानतळ येथील इम्पोर्ट कार्गोच्या सुपुर्दगी आदेश (Delivery Report) वर मुद्रांक शुल्काची आकारणी करणे	१. प्रारुप टिप्पणीस विधी व न्याय विभाग व वित्त विभागाची सहमती घेणे. २. प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करणे ३. शासन मान्यतेनंतर त्यानुसार याबाबतचे आदेश निर्गमित करणे.	शासन, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
६०	बेनामी मालमत्तेच्या बोध होण्यासाठी तसेच गैरव्यवहार टाळण्यासाठी Consent based Aadhaar Authentication Services चा अवलंब दस्तांच्या नोंदणी संबंधी करण्यासाठी नोंदणी अधि-नियमाच्या कलम ६९ अन्वये नियम विहीत करणे	१. प्रारुप टिप्पणीस विधी व न्याय विभाग व वित्त विभागाची सहमती घेणे. २. प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करणे ३. शासन मान्यतेनंतर त्यानुसार याबाबतचे आदेश निर्गमित करणे.	शासन, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक

२. उपरोक्त मुद्यांच्या अनुषंगाने महसूल विभागातील तसेच क्षेत्रीय स्तरावरील सर्व सबंधित अधिकाऱ्यांनी सदर महत्वाची फलनिष्पत्ती क्षेत्रे [Key Result Areas] च्या अंमलबजावणीबाबत काटेकोरपणे कार्यवाही व अंमलबजावणी करण्याची व्यक्तिशः दक्षता घ्यावी.

३. राज्यातील सर्व विभागीय आयुक्त व सर्व जिल्हाधिकारी यांनी वरील दिशानिर्देशांप्रमाणे सदर महत्वाची फलनिष्पत्ती क्षेत्रे [Key Result Areas (KRAs)] पैकी क्षेत्रीय कार्यालयाशी निगडीत बाबीसंदर्भात आपआपल्या जिल्हयांमध्ये प्रभावीपणे अंमलबजावणीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत आणि अशा महत्वाच्या फलनिष्पत्ती क्षेत्राच्या अंमलबजावणीचा आढावा घेवून त्याबाबतचा मासिक प्रगती अहवाल सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी विभागीय आयुक्त यांना सादर करावा आणि विभागीय आयुक्त यांनी अशा महत्वाच्या फलनिष्पत्ती क्षेत्राच्या अंमलबजावणीचा नियमितपणे आढावा घेवून तिमाही प्रगती अहवाल शासनास सादर करावा. त्याचप्रमाणे जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे व नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य यांनी स्वतंत्रपणे सदर महत्वाची फलनिष्पत्ती क्षेत्रे [Key Result Areas (KRAs)] अंतर्गत त्यांच्याशी निगडीत मुद्दयांसंदर्भात अधिनस्थ कार्यालयात होणाऱ्या कार्यवाहीचा आढावा घेवून तिमाही प्रगती अहवाल शासनास सादर करावा.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेताक क्रमांक २०१८०२०७१८०१३५६५१९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

K. P. Wadte

Digitally signed by K. P. Wadte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=092f3d18dd73e55dfcdc33acd72708a0290e9758bc4e1500205b182e2d843c82, cn=K. P. Wadte
Date: 2018.02.07 18:06:39 +05'30'

(कि. पां. वडते)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२,
२. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२,
३. सर्व जिल्हयांचे मा. पालकमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२,
४. मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२,
५. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२,
६. अप्पर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन), मंत्रालय, मुंबई - ३२,
७. सचिव (वने), मंत्रालय, मुंबई - ३२,
८. सर्व जिल्हयांचे पालक सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२,
९. सर्व विभागीय आयुक्त
१०. जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे,
११. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य
१२. सर्व जिल्हाधिकारी
१३. प्रधान सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२,
१४. सर्व सह सचिव व सर्व उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२,
१५. कार्यासन म-८ (निवड नस्ती), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.